# गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशी—४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५)
च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत राज्य विद्यापीठ)
(महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ)
(महाविद्यालयीन विभाग)
एम.आय.डी.सी. रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली — ४४२६०५
फोन/फॅक्स नंबर ०७१३२—२१६५९४ E-Mail : arcollegesectiongug48@gmail.com

(डॉ.एस.एम.रोकडे)
संचालक (प्रभारी)

क्र./ गो.वि./महा.वि /1834/२०१५
दिनांक 23/१०/२०१५

प्रति,

मा. अध्यक्ष/सचिव/प्राचार्य,
गोंडवाना विद्यापीठाशी
संलग्नित सर्व महाविद्यालये

**विषय :— दिनांक १ जानेवारी ते १५ जानेवारी या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्याबाबत.**

संदर्भ :— १. मा. सहसंचालक, शिक्षण संचालक (उ.शि.), पुणे यांचे पत्र क्र.
उशिसं/२०१५/मभापं/मवि—१/९९९५ ,दि.०८.१०.२०१५
२. शासन निर्णय क्र. मभापं—२०१५/प्र.क्र.७०/भाषा—२, दि.२२.०७.२०१५

मा. महोदय,

उपरोक्त विषय व संदर्भीय पत्राचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, शासनाने दि. १२.०४.२०१३ च्या शासन निर्णयान्वये दि. १२.०४.२०१३ च्या शासन निर्णयान्वये दि. १ मे ते १५ मे हा कालावधी भाषा पंधरवडा म्हणून साजरा करण्याच्या सूचना दिल्या होत्या, तथापी उन्हाळी सुट्ट्यांचा कालावधी लक्षात घेवून शैक्षणिक संस्थांना या कार्यक्रमात सहभागी होता यावे या उद्देशाने सदर पंधरवडा हा दि. १ जानेवारी ते १५ जानेवारी करण्यात आलेला आहे. याबाबतचा शासन निर्णय दि. २२ जुलै २०१५ निर्गमित करण्यात आलेला आहे.

तरी सदर पत्राचे अनुषंगाने योग्य कार्यवाही घेण्यात यावी.

(डॉ.एस.एम.रोकडे)
संचालक(प्रभारी)
महाविद्यालयीन व विद्यापीठ विकास मंडळ
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

सहपत्रे :— वरिलप्रमाणे

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
... विभाग
२६६८ ... ९/१०/१५
... दिनांक...

महाराष्ट्र शासन

उच्च शिक्षण संचालनालय

महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१

Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@gov.in

फोन नं. ०२० / २६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९. फॅक्स नं.- ०२०/२६१११९५३

क्र.उशिसं/२०१५/मभापं/मवि-१ | ११९५ दिनांक- ०६/१०/२०१५

8 OCT 2015

प्रति,

१) कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे.

२) विभागीय सहसंचालक
उच्च शिक्षण, सर्व विभाग.

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
7016 ९/१०/१२

विषय :- दिनांक १ जानेवारी ते १५ जानेवारी या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्याबाबत

संदर्भ :- १) शासन पत्र क्र. मभापं-२०१५/प्र.क्र.७०/ भाषा-२, दि.१९.०९.२०१५
२) शासन निर्णय क्र. मभापं-२०१५/प्र.क्र.७०/ भाषा-२, दि.२२.०७.२०१५

महाराष्ट्र शासनाच्या राजभाषा अधिनियम, १९६४ नुसार मराठी ही राज्याची राजभाषा म्हणून स्वीकारण्यात आलेली आहे. केंद्र शासनाने राज्यामध्ये त्रिभाषा सुत्राचा वापर करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. भाषा हे अभिव्यक्तीचे माध्यम असल्यामुळे तिचा प्रचार व प्रसार सर्व माध्यमातून होणे आवश्यक आहे. शासनाने दि.१२.०४.२०१३ च्या शासन निर्णयान्वये दि. १ मे ते १५ मे हा कालावधी भाषा पंधरवडा म्हणून साजरा करण्याच्या सूचना दिल्या होत्या. तथापि उन्हाळी सुट्टयांचा कालावधी लक्षात घेवून शैक्षणिक संस्थांना या कार्यक्रमात सहभागी होता यावे या उद्देशाने सदर पंधरावडा हा दि. १ जानेवारी ते १५ जानेवारी करण्यात आलेला आहे. याबाबतचा शासन निर्णय दि.२२ जुलै २०१५ निर्गमित करण्यात आलेला आहे.

"मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" साजरा करण्याकरिता शासनाने खालील विविध कार्यक्रम आयोजित करण्यास शासनाने मंजूरी दिलेली आहे.

१) महाराष्ट्रातील अमराठी भाषिकांमध्ये मराठीचा प्रसार व प्रचार होऊन ही भाषा त्यांच्या मुखी आणि लेखी रुळावी यासाठी शिबीर त्याचबरोबर वक्तृत्व, लेखन स्पर्धा यांचे आयोजन करणे.

२) शासन व्यवहारात मराठीचा वापर या विषयावर परिसंवाद, कार्यशाळा, राज्यस्तरीय वक्तृत्व, निबंध स्पर्धा यांचे आयोजन करणे.

३) मराठी वाचन संस्कृती वाढविण्यासाठी मराठीतील अभिजात ग्रंथांचा परिचय करुन देणारी तज्ज्ञ व्यक्तींची व्याख्याने, ग्रंथप्रदर्शन, मराठी चित्रपट, इतिहास यांचा परिचय करुन देणारी ग्रंथप्रदर्शने

यांचे आयोजन करणे.

४) लोककला, संगीत , भारुड , गवळण , कथाकथन , काव्यवाचन या विषयी कार्यक्रम, स्पर्धा यांचे आयोजन करणे.

आपल्या अधिनस्त संस्था / महाविद्यालये यांमध्ये उपरोक्त कार्यक्रम आयोजित करुन "मराठी भाषा संवर्धन पंधरवड्रा" साजरा करण्याकरिता आपल्या स्तरावरुन सुचना देण्यात याव्यात व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास सादर करण्यात यावा. (उपरोक्त संदर्भिय शासन पत्र व शासन निर्णयाची प्रत संलग्न)

(डॉ.व्ही. आर. मोरे)
सहसंचालक
उच्च शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य , पुणे- १

प्रत-

मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई -३२ यांना माहितीस्तव सविनय सादर.

दिनांक १ जानेवारी ते १५ जानेवारी या कालावधीत "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" साजरा करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**मराठी भाषा विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः मभापं-२०१५/प्र.क्र.७०/भाषा-२**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: २२ जुलै, २०१५

वाचा :-

१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.मभावा-१०९६/११६/प्र.क्र.७/९६/२०-ब,
२) मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्र.मभादि-२०१२/१८३/प्र.क्र.६१/भाषा-२, दि.१२.४.२०१३
३) मराठी भाषा विभाग शासन परिपत्रक क्र.मभादि-२०१४/प्र.क्र.२८/भाषा-२, दि.१७.४.२०१४
४) मराठी भाषा विभाग शासन परिपत्रक क्र.मभापं-२०१५/प्र.क्र.६१/भाषा-२, दि.२.५.२०१५

प्रस्तावना :-

दिनांक १ मे ते १५ मे हा कालावधी "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" म्हणून साजरा करण्याचा निर्णय संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये घेण्यात आला होता. सन २०१३ पासून दरवर्षी "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" साजरा करण्यात येतो. "भाषा संवर्धन पंधरवडा" साजरा करताना वाचन संस्कृती, व्याख्याने, ग्रंथप्रदर्शन, लोककला इत्यादींचा समावेश असल्याने, यामध्ये शाळा व महाविद्यालये यांचा सहभाग आवश्यक आहे. भाषा संवर्धन उपक्रमांमध्ये शासकीय कार्यालयांबरोबरच शैक्षणिक संस्थांचा सहभाग वाढविण्यासाठी सद्याचा दिनांक १ मे ते १५ मे या पंधरवडयाच्या कालावधीत बदल करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय:-

मराठी भाषेचे वैभव जपण्यासाठी, तिचे संवर्धन व भरभराट होण्यासाठी प्रतिवर्षी दिनांक १ जानेवारी ते १५ जानेवारी हा कालावधी "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" म्हणून साजरा करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" साजरा करण्याबाबत खालील विविध कार्यक्रम आयोजित करून पंधरवडा साजरा करण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

अ) महाराष्ट्रातील अमराठी भाषिकांमध्ये मराठीचा प्रसार आणि प्रचार होऊन ही भाषा त्यांच्या मुखी आणि लेखी रुळावी यासाठी तज्ज्ञ मंडळींकडून कार्यशाळा / शिबीर आयोजित करण्यात यावे. त्यांचेसाठी वक्तृत्व, लेखन स्पर्धांचे आयोजन करावे.

आ) शासन व्यवहारात मराठीचा वापर या विषयावर मराठीतील टिप्पणी व प्रारुप लेखन या विषयावर परिसंवाद, कार्यशाळा यांचे आयोजन, तसेच राज्यस्तरीय वक्तृत्व, निबंधस्पर्धा यांचे आयोजन करावे, तसेच या कामी सेवानिवृत्त अनुभवी तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेण्यात यावे.

इ) मराठी वाचन संस्कृती वाढविण्यासाठी मराठीतील अभिजात ग्रंथांचा परिचय करून देणारी तज्ज्ञ व्यक्तींची व्याख्याने, ग्रंथप्रदर्शन, विविध प्रकारचे कोश वांङमय, माहितीपट, मराठी चित्रपट, इतिहास यांचा परिचय करून देणारी ग्रंथप्रदर्शने यांचे आयोजन करावे.

ई) लोककला, लोकसंगीत-भारूड, गवळण, कथाकथन, काव्यवाचन या विषयी कार्यक्रम, स्पर्धा यांचे आयोजन करावे. यासाठी या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन/सहकार्य घेण्यात यावे.

उ) भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या परिभाषा कोशासंबंधी तीन दिवशीय कार्यशाळा आयोजित करावी यासाठी भाषा तज्ज्ञांचे मार्गदर्शन घ्यावे.

राज्यात तसेच जिल्हा स्तरावर त्यांच्या अधिपत्याखाली असलेल्या कार्यक्षेत्रात सदर पंधरवडा खालीलप्रमाणे साजरा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

अ) मुंबई (मुख्यालय स्तरावर) - सर्व मंत्रालयीन विभाग, त्यांच्या अधिपत्याखालील मुंबईतील कार्यालये

ब) सर्व अनुदानित/खाजगी शाळा, महाविद्यालये व विद्यापीठे

क) सर्व विभागीय आयुक्त यांचे कार्यालय

ड) सर्व जिल्हाधिकारी- विभागाच्या अधिपत्याखालील जिल्हास्तरीय कार्यालये

इ) मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषदा) - तालुकास्तरावर, ग्रामिणस्तरावर

ई) राज्यातील केंद्र शासनाच्या अधिपत्याखालील कार्यालये/मंडळे/सार्वजनिक उपक्रम

उ) सर्व खाजगी, व्यापारी बँका

या कार्यक्रमाकरिता येणारा खर्च प्रत्येक वित्तीय वर्षात त्या त्या संबंधित विभागाने/कार्यालयाने त्यांच्या कार्यालयीन खर्चासाठी मंजूर होणा-या आर्थिक तरतूदीतून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक 201508111516284533 असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Leena Vivek Dhuru

Digitally signed by Leena Vivek Dhuru
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Desk Officer, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Leena Vivek Dhuru
Date: 2015.08.11 16:37:18 +05'30'

लिना वि. धुरु
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव,

२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव

३. सर्व मा.मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,